अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्यविद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी.
पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

जयवर्धन भिमराव गच्चे

एम.ए. (अर्थशास्त्र), नेट.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. विजय एन. भोपाळे

संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
स्वातंत्र्य सैनिक सुर्यभानजी पवार
महाविद्यालय, पूर्णा (जं) जि. परभणी

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

जुलै - 2019

अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

प्रस्तावना :

जगातील कोणत्याही राष्ट्राची आर्थिक प्रगती ही त्या देशाच्या कृषीक्षेत्रावर झालेली दिसून येते. आज जगात प्रगत समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचा विकास हा त्या देशातील कृषी व्यवसाय सुधारल्यानंतर इतर क्षेत्रात देखिल उल्लेखनीय प्रगती झालेली दिसून येते. कृषी व्यवसायाची वाढ करित असतांना शेतीचा आकार व उत्पादकता या कडे लक्ष द्यावे लागते. ज्या शेतकऱ्याकडे जमिनीची उपलब्धता कमी आहे त्याला 'अल्पभूधारक शेतकरी' असे म्हणतात.

प्रत्येक देशाच्या कृषी विकासासाठी त्या शेतकऱ्यांची धारणक्षमता किती आहे किंवा कोणत्या प्रकारची आहे यावर शेतीचा विकास अवलंबून असतो. ज्या देशात शेती व्यवसायासाठी असणारी जमिनीची उपलब्धता कमी आहे किंवा अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त असेल तर त्यांची आर्थिक स्थिती नाजूक असते व शेती व्यवसायासमोर विविध समस्या निर्माण होतात.

ज्या राष्ट्रात लोकसंख्या अधिक आहे. त्या राष्ट्रात कृषी व्यवसायावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण अधिक असते. शेती व्यवसायाशी बांधिलकी जपणाऱ्या देशात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक दिसून येते. त्यामुळे शेती व्यवसायात अवश्यक असलेले तंत्रज्ञान, बी-बियाणे, अवजारे, किटकनाशके व जलसिंचनाच्या सुविधा इत्यादींचा वापर करता येत नाही. याचा विपरित परिणाम शेती व्यवसायावर होतो. प्रगत समजल्या जाणाऱ्या राष्ट्रात देखिल शेतीव्यवसाय प्रारंभिच्या काळात जेमतेमच होता. शेती व्यवसायाच्या प्रगतीवर इतर क्षेत्रात देखील त्यांनी प्रगती साधील आहे. त्या राष्ट्रातील शेती व्यवसायावर अवलंबित्वाचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे धारण क्षेत्राचा आकार देखील वाढला. शेती व्यवसायात अमुलाग्र त्या सुधारणा करणे शक्य झाले. ज्यास्त लोकसंख्या असलेल्या राष्ट्रात शेतीची धारण क्षमता किती आहे. हे पाहणे आवश्यक ठरते.

अल्पभूधारक शेतकरी म्हणजे एक हेक्टर पेक्षा जमीनीचा आकारमान असलेला शेतकरी होय. ज्या शेतीधारण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, अवजारे, बी-बियाणे इत्यादींचा योग्य वापर करण्याइतपत जमिन नसलेला शेतकरी होय. थोडक्यात कमी शेती असलेला शेतकरी म्हणजे अल्पभूधारक शेतकरी होय. या शेतीच्या धारण क्षेत्रानुसार भूधारकांचे वर्गीकरण सामान्यत: अल्पभूधारक शेतकरी, मध्यम शेतकरी व मोठे शेतकरी असे वर्गीकरण करता येते.

भारतातील बहूसंख्य जनता ही शेती व्यवसायावर आपली उपजिविका करते. 1950-51 मध्ये 70% तर 2009-10 मध्ये 52% एवढी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असलेली दिसते. जरी कृषी व्यवसायातील हे अवलंबित्वाचे प्रमाण कमी होत असले तरी द्वितीय व तृतिय क्षेत्रापेक्षा उपजिवीकेचे साधन म्हणून कृषी व्यवसायाकडे पाहिले जाते.

शेतीचा आकार आणि उत्पादकता ह्यात परस्पर संबंध आहे. भारतात उपलब्ध असलेली शेतजमिन व लोकसंख्या हे दोन घटक जुळत नाहीत. जमिनीचा पुरवठा स्थिर असतो. लोकसंख्या मात्र वाढत जाते. परिणामत: जमिनीची मागणी वाढून धारणक्षेत्राचा आकार लहान होत जातो. अशा जमिनीच्या लहान तुकड्यावर आधुनिक पद्धतीने शेतीकरणे परवडत नाही. कारण नवीन उत्पादन तंत्र, संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, जलसिंचनाच्या सुविधा यांचा वापर योग्य प्रमाणावर करणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेवर व त्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम पडतो.

भारतातील शेतीच्या अल्पउत्पादकतेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीचा अत्यंत लहान अकार, शेतीच्या लहान अकाराच्या संदर्भात दोन बाजु दिसतात. एक म्हणेज धारण क्षेत्राचा लहान आकार व दुसरे लहान धारणक्षेत्र एकाच ठिकाणी न राहता विखुरलेले असणे. धारणक्षेत्र लहान होण्यामागे शेतजमीनीचा वारसाहक्क, सिलिंग ॲक्ट, नव्याने शेती विकत घेतलेले शेतकरी व शासकिय जमिनीवर (गायरान) उपजिवीका करणारे शेतकरी हे अल्पभूधारक असण्याची कारणे आहेत.

शेती व्यवसायातील सामाजिक बाजु पाहतांना अल्पभूधारक सर्व जातीत आढळून येतता. जशी जातीची उतरंड आहे. अगदी त्याच प्रमाणे कनिष्ठ समजणाऱ्या जातीत

अल्पभूधारकता जास्त दिसून येते. अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारायची असेल तर काही मुलभूत सुधारणा करणे आवश्यक आहे. शेती व्यवसायावरील अवलंबित्व असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी केले पाहिजे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना सामुहिक शेतीचा प्रयोग अंमलात आणला पाहिजे. द्वितीय व तृतिय क्षेत्राचा विकास करून शेती व्यवसायातील अतिरिक्त मनुष्यबळ या दोन क्षेत्रासाठी वापरले पाहिजे.

यावरून असे लक्षात येते की, अल्पभूधारक शेतकरी यांची आर्थिक स्थिती मजबुत करायची असेल तर अल्पभूधारक शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा पुरविल्या पाहिजे. कृषी क्षेत्राच जास्तीतजास्त विकास करून इतर उद्योग व्यवसायात जास्त लोकसंख्या सामावून घेतली पाहिजे. अल्पभूधारक शेतकऱ्यांनी आपल्या समस्येवर तोडगा म्हणून सामुहिक शेती या सारख्या तंत्राचा प्रयोग करणे आवश्यक आहे.

अल्पभूधारक शेतकरी व्याख्या व अर्थ :

कोणत्याही देशाचा विकास हा देशातील कृषी, उद्योग व सेवाक्षेत्र या सर्वांच्या विकासावर अवलंबून असतो. व प्रत्येक क्षेत्राचा विकास हा परस्परावर अवलंबून असतो.

भारतामध्ये शेती योग्य जमिनीची उपलब्धता प्रती शेतकऱ्यांसाठी इ. स. 1960-61 मध्ये 2.3 हेक्टर होती. तर 2002-03 मध्ये 1.4 हेक्टर एवढी होती. तर 2011 मध्ये ती 1.0 हेक्टर पेक्षा कमी झाली. शेतीच्या कमी धारण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, भांडवल खते, बी-बियाणे, किटकनाशके व जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीस मर्यादा पडतात. व आर्थिक स्थिती कमजोर होते.

व्याख्या :

"अल्पभूधारक म्हणजे आपल्या धारण क्षेत्रात नवीन उत्पादन तंत्र, बी-बियाणे, किटकनाशके व जलसिंचन यासारख्या बाबींचा योग्य वापर न करता येण्याजोगे लहान जमिनीचे क्षेत्र होय. "

"एक हेक्टर पेक्षा कमी जमीन असलेला शेतकरी म्हणजे अल्पभूधारक होय"

"अल्पभूधारक म्हणजे जमिनीची धारण क्षमता कमी असलेला शेतकरी होय. "

“एखाद्या व्यक्ती जवळ जमिनीत कृषी उत्पादनासाठी लागणाऱ्या आदानांचा वापर न करू शकणारा कास्तकार म्हणजे अल्पभूधारक. ”

“अकार्यक्षम धारण क्षेत्रात शेती कसणारा शेतकरी म्हणजे अल्पभूधारक.”

अल्पभूधारक म्हणजे कमी शेती असलेला शेतकरी होय.अल्पभूधारक असणे म्हणजे एकप्रकारची मागास शेती असणे. त्या अल्पभूधारकतेतून उत्पन्न कमी प्राप्त होते. तसेच अल्पभूधारकतेमुळे शेतकी कर्ज वाढते. मनुष्याच्या कार्यप्रवृत्तीस व नवीन सृजनात्मक शक्तीला अवरोध निर्माण होतो.

थोडक्यात अल्पभूधारक म्हणजे कसण्यासाठी कमी जमिन उपलब्ध असलेला शेतकरी. या अल्पभूधारक स्थितीमुळे आर्थिक स्थिती उंचावता येत नाही.

समस्यासूत्रण :

नांदेड जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय स्वरूपाची आहे. औद्योगिकीकरणामध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतमालाची मालाला योग्य तो हमीभाव मिळत नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीचे तुकडीकरण वाढत आहे, सिलंग ॲक्ट, वारसाहक्क, नवीन जमिन घेतलेले व शासकिय जमिनीवरील (गायरान) अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे.

संशोधनाचे महत्त्व :

‘ग्रामिण भागात जन्मनाऱ्या लक्षावधी लोकांना शेती शिवाय पर्याय नाही. इतर उद्योगात जेवढ्या लोकांची आवश्यकता असते. तेवढेच लोक निवडले जातात. शेतीत निवडीचा प्रश्नच नसतो. निराधारांना-निर्वासितांना त्यांच्या दुर्धर काळात थोड्याफार प्रमाणात आधार देण्यास व त्यांचे पुर्नवसन करण्यास शेती असते. शेती ही जगातील लोकसंख्येचे रक्षण करणारे एक मोठी शक्ती आहे.’ हे शेतीविषयीचे हावर्ड लुईस यांचे मत बोलके ठरते. देशाचा आर्थिक विकास बहुतांश कृषीवरच अवलंबून आहे.

अल्पभूधारक आपल्या शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान, अवजारे, बी-बियाणे, किटकनाशके व जलसिंचन या सारख्या आदानांचा वापर त्याला करणे शक्य नसते. त्यामुळे अल्पभूधारकांची उत्पन्न पातळी इतर शेतकऱ्यांपेक्षा निम्न पातळीची असते. त्यांची आर्थिक

स्थिती दयनीय स्वरूपाची असते. त्यामुळे अल्पभूधारकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या समस्या जाणून घेता येतात. समस्येचे निराकरण करता येते. त्यांची शेतीतील उत्पन्न पातळी कशी वाढवता येते, नवीन उत्पादन तंत्राचा वापर कसा करावा या अनुषंगाने सुधारणा घडवून आणता येतात. शासकिय व लोकसहभागातून त्यांची आर्थिक स्थिती सुदृढ करता येते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या धारण क्षेत्राचा अभ्यास करणे.
4. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांनी वापरलेल्या आदानांचा अभ्यास करणे.
5. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे धारण क्षेत्र व जमिनीची उत्पादकता याचा अभ्यास करणे.
6. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारकता निर्माण होण्याची कारणे अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके :

1. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होतांना दिसत नाही.
2. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनाचा स्तर निम्न आहे.
3. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होतांना दिसून येत नाही.
4. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकरी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करत नाहीत.
5. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तूत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिकशास्त्रातील संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तथ्य संकलनासाठी प्राथमिक सामग्री आणि दुय्यम सामग्री या दोन्ही प्रकारांचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य संकलनाच्या पद्धती :

तथ्य संकलनाच्या दोन पद्धती आहेत.

1)**प्राथमिक पद्धत** :

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्याची अचुक माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक पद्धती मध्ये प्रश्नावली या साधनाचा वापर महिती संकलनासाठी करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात येईल.

2) **दुय्यम पद्धत** :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून सामग्रीचे संकलन केले जाईल. या मध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, दैनिके, मासिके, कार्यालयीन अहवाल तसेच इंटरनेट वरील सबंधीत माहिती इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

नमूना निवड :

सदर संशोधनासाठी साधा सहेतूक नमूना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे. नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्यांपैकी अधिक लोकसंख्या असणाऱ्या व पुरेशा प्रमाणात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण उपलब्ध असणाऱ्या व नसणाऱ्या 80 गावांची निवड करण्यात येईल. व प्रत्येक गावातून 5 अल्पभूधारक शेतकरी या प्रमाणे 400 नमूना निवड करण्यात येईल.

संशोधनाचा कालावाधी :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सन 2009 ते 2018 हा दहा वर्षाचा कालावधी निवडला आहे. या कालावधीतील नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांसंबंधीत माहिती आकडेवारीच्या स्वरूपात संकलित केली जाणार आहे. ही माहिती त्यांची कार्यपद्धती, वृद्धी आणि समस्या यांच्याशी संबंधीत असेल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

नांदेड जिल्ह्यातील बहुतेक अभ्यास हा महत्त्वपूर्ण अल्पभूधारक शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती या बाबात करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात

अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या रचनेतील बदल याचा अभ्यास आहे. सदरील अभ्यास हा नांदेड जिल्ह्यापुरताच मर्यादीत असेल.

आकडेवारीचे विश्लेषण :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनातील आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी गणितीय आणि सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. जसे शेकडेवारी, वृद्धीदर, सहसंबंध इत्यादी. सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी, तक्ते, आलेखांचाही उपयोग करण्यात येईल.

प्रकरण रचना :

1) **प्रस्तावना**

2) **संशोधन साहित्याचा आढावा**

3)**नांदेड जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक स्थिती**

4)**नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठीच्या शासकिय योजनांचा अभ्यास**

5)**नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा**

6) **निष्कर्ष व शिफारशी**

संदर्भ सूची

1. भारतीय अर्थव्यवस्था, कै. डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव, निराली प्रकाशन पुणे.
2. भारतीय अर्थव्यवस्था, दत्त आणि सुंदरम्, एस. चंद. कंपनी लि. नई दिल्ली.
3. कृषी अर्थशास्त्र, डॉ. निता वाणी, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
4. कृषी अर्थशास्त्र, डॉ. विजय कवी मंडन, मंगेश प्रकाशन, नागपूर.
5. कृषी अर्थशास्त्र, डॉ. एस. बी. कटमुसरे, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.
6. कृषी अर्थशास्त्र, भारतातील शेती व्यवसाय, कै. डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव, निराली प्रकाशन पुणे.
7. Agricultural problems in India, Singh and Sandhu.
8. Farmers suicides, P. Sainath.
9. शेतकरी बळीराजा.
10. योजना मासिक.

संशोधक	मार्गदर्शक
जयवर्धन भिमराव गच्चे एम.ए. (अर्थशास्त्र), नेट.	**प्रा. डॉ. विजय एन. भोपाळे**